# प्रेसनोट

दि.०८/०३/२०२२

## उप जिल्हा रूग्णालय, भोर येथील वैद्यकिय अधीक्षकावर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | भोर पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ४२ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक — डॉ. अमित हिंदुराव सरदेसाई, वय — ६० वर्षे,<br>पद - वैद्यकिय अधीक्षक, वर्ग १, उप जिल्हा रूग्णालय, भोर,<br>ता. भोर, जिं.पुणे. |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- (दहा हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ५,०००/- (पाच हजार रूपये) |

पडताळणी व सापळा दिनांक :- ०८/०३/२०२२.

ठिकाण :- उप जिल्हा रूग्णालय, भोर.

थोडक्यात माहिती :- वैद्यकीय अधीक्षक यांनी त्यांचे कार्यक्षेत्रात सोनोग्राफी सेंटरला प्रत्यक्ष भेट देवून तपासणी करून त्याचा अहवाल जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे पाठवायचा असतो. यातील तक्रारदार हे व्यवसायाने डॉक्टर असून त्यांचे भोर येथे हॉस्पिटल आहे. हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफी सेंटर आहे. सोनोग्राफी सेंटरची तपासणी करून अनियमितता आढळल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे प्रतिकुल शेरा/अहवाल न पाठविणेसाठी लोकसेवक यानी दहा हजार रूपये लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.विभागास दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता तक्रारदार यांच्या भोर येथील हॉस्पिटलमध्ये सोनोग्राफी सेंटरची तपासणी करून अनियमितता आढळल्यास जिल्हा शल्य चिकित्सक यांचेकडे प्रतिकुल शेरा/अहवाल न पाठविणेसाठी आरोपी लोकसेवक यानी तडजोडीअंती ५ हजार रूपयाची लाच मागणी करून स्वीकारली म्हणून वरीलप्रमाणे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटचे पोलीस निरीक्षक श्रीराम शिंदे तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा. पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे व श्री. सुहास नाडगौडा, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमुद क्रमांकावर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.


१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४

२. अॅन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३

३. व्हॉट्स-अॅप क्रमांक पुणे — ७८७५३३३३३३ ४. व्हॉट्स-अॅप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००

५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in

६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in

७. ऑनलाईन अॅप तक्रार - www.acbmaharashtra.net.in


(श्रीहरी पाटील)

सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)

लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.